सन २०१८-१९ करीता स.सा.का.ना कर्जे या योजनेतंर्गत श्री. सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.,कुमठे, पो. टिकेकरवाडी ता.दक्षिण सोलापूर,जि. सोलापूर या कारखान्यास ऊस खरेदी कर भरण्यासाठी बिनव्याजी कर्ज मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक : ससाका-२०१८/प्र.क्र. ०८ (शिकाना) /३-स

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १८ मार्च २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका १०८९/१०११/सीआर १३८/८९/३स, दिनांक २३ जानेवारी, १९९०

२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका १०८९/१०११/प्र.क्र. १३८/८९/३सी, दिनांक १० जून, १९९२

३) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. साआ/कक्ष-६/अर्थ-३/सिध्देश्वर/ उखक/बिव्याकर्ज/रुपां/१३८३/२०१८, दि.११.०५.२०१८ चे पत्र.

४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/ अर्थ-३, दि.०२.०४.२०१८.

५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक : ससाका-२०१८/प्र.क्र. ०८ (शिकाना) / ३-स, दिनांक १३.११.२०१८.

०६) भाग १- महसूल व जमा यांचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज.

शासन शुध्दीपत्रक :-

शासन निर्णय क्रमांक : ससाका-२०१८/प्र.क्र. ०८ (शिकाना) /३-स, दि.१३.११.२०१८ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

०२. शासन निर्णय दि.१३.११.२०१८ मधील परिच्छेद क्र.०५ मध्ये नमूद करण्यात आलेले लेखाशिर्ष "००४०- विक्रीकर-१०४-ऊस खरेदी वरील कर या खाली ०१- कर वसुली" **याऐवजी**
"००४० विक्री, व्यापार इत्यादीवरील कर, १०६ ऊस खरेदीवर कर, (०१) ऊस खरेदीवर कर, (०१) (०१) कर वसुली (००४००३१६)" असे वाचावे.

०३. शासन निर्णय दि.१३.११.२०१८ मधील परिच्छेद क्र. ०६ मधील ओळ क्र. ६ व ७ मध्ये नमूद करण्यात आलेले लेखाशिर्ष "००४० विक्री, व्यापार इत्यादीवरील कर, १०६ ऊस खरेदीवर कर, (०१) (०१) कर वसुली (००४००३१६) " **याऐवजी**
" ६४२५- सहकारासाठी कर्ज, १०८- इतर सहकारी संस्थांना कर्ज (००) (०६) सहकारी साखर कारखान्यांना कर्जे (६४२५ ५१९१)" असे वाचण्यात यावे.

०४. शासन निर्णय दि.१३.११.२०१८ मधील परिच्छेद क्र. ०७ मध्ये "साखर आयुक्त, पुणे यांना असे आदेश देण्यात येत आहे की, श्री. सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि. कुमठे, पो. टिकेकरवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर या कारखान्यास ऊस खरेदी कर भरण्यासाठी मंजूर केलेल्या बिनव्याजी कर्जाची रक्कम सदर कारखान्याच्या ऊस खरेदी कर थकबाकीपोटी संबंधित लेखाशिर्षाखाली समयोजन

करण्यासाठी महालेखापाल, मुंबई / महालेखापाल, नागपूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून सदर रक्कमेचे प्रत्यक्ष समायोजन करून घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी" **याऐवजी**
"प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व साखर आयुक्त, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच साखर आयुक्त, पुणे यांना असे आदेश देण्यात येत आहे की, श्री. सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि. कुमठे, पो. टिकेकरवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर या कारखान्यास ऊस खरेदी कर भरण्यासाठी मंजूर केलेल्या बिनव्याजी कर्जाची रक्कम सदर कारखान्याच्या ऊस खरेदी कर थकबाकीपोटी संबंधित लेखाशिर्षाखाली समयोजन निरंक रकमेचे देयक कोषागारात सादर करून करण्यात यावे." असे वाचावे.

०५. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०३१८१६५१३४५५०२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334edd f7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.03.18 16:53:58 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर
२. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई
३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. प्रादेशिक सहसंचालक (साखर) औरंगाबाद/पुणे.
५. अप्पर विक्रीकर आयुक्त, औरंगाबाद/पुणे.
६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद/पुणे.
८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर.
९. सहाय्यक विक्रीकर आयुक्त, सोलापूर.
१०. वित्त विभाग (कराधान-३/व्यय-२)
११. कार्यकारी संचालक, श्री.सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि., कुमठे, पो. टिकेकरवाडी, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर
१२. निवडनस्ती - ३ स.